# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## सामान्य प्रशासन विभाग
## परिपत्रक/२०२६

विषयः- **PT, PF, ESIC, Allowances बाबत असल्यास, आक्षेप/ हरकत नोंदविण्याबाबत.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने यापूर्वी विद्यापीठाच्या स्वच्छतेचे कंत्राट **मे. डी. एम. इंटरप्रायजेस**, वाशी, नवी मुंबई या एजन्सीला ई निविदा प्रक्रियेद्वारे सोपविले होते. सदर एजन्सी विद्यापीठात दि. ०२-०८-२०२१ ते ०९-०२-२०२६ या कालावधीत कार्यरत होती.

त्याअनुषंगाने सदर एजन्सीमार्फत उपरोक्त नमूद कालावधीमध्ये विद्यापीठ मुख्य परिसर, उपपरिसर धाराशिव, संतपीठ पैठण आणि मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे कार्यरत असलेल्या कंत्राटी सफाई कामगारांना कळविण्यात येते की, आपणास सदर एजन्सीमार्फत अदा केलेले वेतन, PT, PF, ESIC, Allowances बाबत आपले काही आक्षेप/ हरकत असेल तर सदर परिपत्रक निर्गमित झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत लेखी स्वरुपात स्वच्छता निरीक्षक यांचे कार्यालय येथे जमा करावेत. आक्षेपासोबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रती सादर कराव्यात. अर्जासोबत कोणताही पुरावा जोडला नाही तर सदर अर्जाची दखल घेतली जाणार नाही. आक्षेप सादर करताना कंत्राटी सफाई कामगाराने वैयक्तिक ओळखीच्या पुराव्याची स्व-साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

याची नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )( **कुलसचिव**
संदर्भ :- सा.प्र./२०२६/650 )(
दिनांक :- १३-०३-२०२६ )(

या परिपत्रकाची प्रतः-

१) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर धाराशिव.
२) सर्व संचालक/ विभागप्रमुख, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावे.
४) प्राचार्य, मॉडेल कॉलेज, घनसावंगी, जि. जालना.